:: जाहिरात ::

# महाराष्ट्र शासन
# शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
# महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे -४११ ००१

शासन पत्र क्र- आस्था-२०१०/१५६०/प्र.क्र.४३२/ई-६, दिनांक- २ जुलै २०११, व दिनांक- १६/७/२०१३ नुसार पदे भरण्यात येत आहेत. महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१ व विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण पुणे यांच्या आस्थापनेवरील खाली नमूद केलेल्या संवर्गातील रिक्त पदांच्या संख्येइतकी रिक्त पदे भरण्याकरीता खुल्या व मागासवर्गीय प्रवर्गातील सरळसेवा भरतीसाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन (online) पध्दतीने महाराष्ट्र ज्ञान महामंडळ, पुणे (MKCL) या संस्थे मार्फत अर्ज मागविण्यांत येत आहेत. रिक्त पदांचा तपशिल , शैक्षणिक अर्हता, विहीत केलेली वेतनश्रेणी, समांतर आरक्षण, नियुक्तीच्या अटी व शर्ती ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याबाबतच्या सुचना शिक्षण संचालनालयाच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावर व महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित (MKCL) या संस्थेच्या http://oasis.mkcl.org/dheसंकेतस्थळावर दिनांक- २६/०९/२०१३ पासून ते दिनांक- १४/१०/२०१३ पर्यन्त उपलब्ध आहेत.

**शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण मुख्यालय, रिक्त पदांचा प्रवर्गनिहाय तपशिल**

**पद : उच्चश्रेणी लघुलेखक (वेतनश्रेणी – ९३००-३४८०० ग्रेड पे -४४००) (एकूण - १ पद)**

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | रिक्त पदे | महिला | माजी सैनिक | अंशकालीक | प्रकल्पग्रस्त | भुकंपग्रस्त | अपंग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | खुला | १ | १ | ० | ० | ० | ० | ० |
| | **एकूण** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** |

**पद : निन्मश्रेणी लघुलेखक (वेतनश्रेणी – ९३००- ३४८०० ग्रेड पे -४३००) (एकूण- १ पद)**

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | रिक्त पदे | महिला | माजी सैनिक | अंशकालीक | प्रकल्पग्रस्त | भुकंपग्रस्त | अपंग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | खुला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **एकूण** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** |

**टिप-** सदरचे पद महाराष्ट्रातील शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण यांच्या अधिपत्याखालील विभागीय कार्यालयामध्ये पदस्थापनेसाठी पात्र राहील.

**पद : लघुटंकलेखक (वेतनश्रेणी – ५२००- २०२०० ग्रेड पे -२४००) (एकूण- १ पद)**

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | रिक्त पदे | महिला | माजी सैनिक | अंशकालीक | प्रकल्पग्रस्त | भुकंपग्रस्त | अपंग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | खुला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **एकूण** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** |

**पद : लिपिक टंकलेखक (वेतनश्रेणी ५२००-२०२०० ग्रेड पे- १९००) (एकूण पदे २७)**

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | रिक्त पदे | महिला | माजी सैनिक | समांतर आरक्षण | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | अंशकालीक | प्रकल्पग्रस्त | भुकंपग्रस्त | अपंग (अल्पदृष्टी) LV |
| १ | अनुसूचित जाती | २ | ० | १ | ० | ० | ० | ० |
| २ | अनुसूचित जमाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३ | विमुक्त जाती (अ) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ४ | भ.ज.-ब | १ | ० | १ | ० | ० | ० | ० |
| ५ | भ.ज.- ड | १* | १ | ० | ० | ० | ० | ० |
| ६ | वि.मा.प्र. | १ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ७ | इ.मा.व | ६ + १* | १ | २ | २ | ० | ० | ० |
| ८ | खुला | १२ + १* | १ | २ | २ | १ | १ | १ (अल्पदृष्टी) LV |
| | **एकूण** | **२७** | **३** | **६** | **४** | **१** | **१** | **१** |

***** ने चिन्हांकित केलेले पद महिलासाठी राखीव आहे..

**पद : वाहन चालक (वेतनश्रेणी – ५२००-२०२०० ग्रेड पे -१९००) (एकूण पदे १)**

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | रिक्त पदे | महिला | माजी सैनिक | अंशकालीक | प्रकल्पग्रस्त | भुकंपग्रस्त | अपंग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | खुला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **एकूण** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** |

**पद : शिपाई (वेतनश्रेणी – ४४४०-७४४० ग्रेड पे -१३००) (एकूण पदे ३)**

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | रिक्त पदे | महिला | माजी सैनिक | अंशकालीक | प्रकल्पग्रस्त | भुकंपग्रस्त | अपंग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अनुसुचित जमाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| २ | भ.ज.ब | १ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३ | खुला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **एकूण** | **३** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** |

## * विभागीय सहसंचालक , उच्च शिक्षण पुणे विभाग पुणे, रिक्त पदांचा प्रवर्गनिहाय तपशिल

**पद : लिपिक टंकलेखक (वेतनश्रेणी ५२००-२०२०० ग्रेड पे- १९००) (एकूण पदे ५)**

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | रिक्त पदे | महिला | माजी सैनिक | अंशकालीक | प्रकल्पग्रस्त | भुकंपग्रस्त | अपंग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | भ.ज.-क | १ | ० | ० | ० | ० | ० | १ (अस्थिव्यंग किंवा कर्णबधीर) |
| २ | इ.मा.व | १ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| ३ | खुला | १ + २* | २ | १ | ० | ० | ० | ० |
| | **एकूण** | **५** | **२** | **१** | **०** | **०** | **०** | **१** |

* ने चिन्हांकित केलेले पद महिलासाठी राखीव आहे.

**पद : सफाई कामगार, (वेतनश्रेणी – ४४४०-७४४० ग्रेड पे -१३००) (एकूण पदे १)**

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | रिक्त पदे | महिला | माजी सैनिक | अंशकालीक | प्रकल्पग्रस्त | भुकंपग्रस्त | अपंग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | खुला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **एकूण** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** |

**पद : स्वयपाकी मदतनीस (वेतनश्रेणी – ४४४०-७४४० ग्रेड पे -१६००) (एकूण - १ पद)**

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | रिक्त पदे | महिला | माजी सैनिक | अंशकालीक | प्रकल्पग्रस्त | भुकंपग्रस्त | अपंग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | खुला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **एकूण** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** |

**पद : ग्रंथपाल-नि-वार्डन (वेतनश्रेणी – ९३००- ३४८०० ग्रेड पे -४३००) (एकूण- १ पद)**

| अ.क्र. | जातीचा प्रवर्ग | रिक्त पदे | महिला | माजी सैनिक | अंशकालीक | प्रकल्पग्रस्त | भुकंपग्रस्त | अपंग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | खुला | १ | ० | ० | ० | ० | ० | ० |
| | **एकूण** | **१** | **०** | **०** | **०** | **०** | **०** | **०** |

(**टिप :** पदांच्या एकूण व संवर्गनिहाय संख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी राखून ठेवलेले आहेत.)

*सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग, पुणे यांच्या आस्थापनेवरील पदे आहेत. त्यांचे आदेश सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे निर्गमित करतील.

परीक्षेसाठी विहित केलेला नमुना अर्ज, नियम शैक्षणिक अर्हता व अटीबाबतची सविस्तर माहिती एम.के.सी.एल. च्या विहित केलेल्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदरची माहिती http://oasis.mkcl.org/dhe या संकेतस्थळावर मिळेल. त्याच प्रमाणे सदरील माहिती शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण यांच्या www.dhepune.gov.in या संकेतस्थळावरही उपलब्ध राहील.

**( डॉ.प्र.रा.गायकवाड )**
प्र. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे १

## : इतर अटी व शर्ती :

१. समांतर आरक्षणानुसार माजी सैनिक, महिला इ. प्रवर्गात्‍ील उमेदवारांना देय असलेल्या सवलती देण्यात येतील.

२. अंशकालीन कर्मचारी , स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य उमेदवारांना देय असलेल्या सवलती देण्यात येतील.

३. उक्त लिपिक-नि-टंकलेखक संवर्गातील, वाहन चालक संगवर्गातील व शिपाई संवर्गातील पदे पदोन्नतीने, सेवानिवृत्तीने, स्वेच्छा सेवानिवृत्तीने , राजीनामा, आंतरविभाग/जिल्हा बदली तसेच मयत झाल्याने रिक्त झालेल्या आहेत. सदरील पदे भरण्यासाठी निवड यादी व प्रतीक्षा यादी १ वर्ष मुदतीसाठी किंवा पुढील सेवा भरतीची जाहिरात देण्यात येईल त्या दिनांकापर्यत यापैकी जे आधी घडेल त्या दिनांकापर्यत विधीग्राहय ठरेल तद्‌नंतर ही निवड सूची व्यपगत होईल.

४. **वयोमर्यादा :-**

उमेदवाराचे वय जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिवशी किमान १८ वर्ष राहील. खुल्या संवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३३ वर्षे आणि मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ३८ वर्ष राहील. तसेच अपंग प्रवर्गातील / माजी सैनिक उमेदवारांसाठी जाहिरातीच्या दिवशी ४५ वर्ष ही कमाल वयोमर्यादा शिथिलक्षम राहील.अंशकालीन व्यक्तिंसाठी वयोमर्यादा ४६ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील. त्याचबरोबर अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंसाठी त्यांची गुणवत्ता व पात्रता विचारात घेवून उच्च वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

५. **शैक्षणिक अर्हता :-**

**१) उच्चश्रेणी लघुटंकलेखक :-** माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.
अ) ज्यांनी निन्मश्रेणी लघुलेखक पदावर किमान ३ वर्षाची नियमित सेवा झालेला आहे आणि या पदावर नामनिर्देशनाने भरतीसाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हत पूर्ण करीत आहेत, अशा योग्य व्यक्तिंच्या जेष्ठता अधीन पात्रता या निकषाच्या आधारे पदोन्नतीने किंवा

ब) ज्यानें श्रुतलेखनातील १२० श.प्र.मि गतीचे.व इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि , मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि व या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र मिळालेले आहे अशा उमेदवारांमधुन नामनिर्देशनाने केली जाईल.

**२) निन्मश्रेणी लघुटंकलेखक :-** माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. अथवा उच्च शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र धारक , मराठी लघुलेखन १०० श.प्र.मि. तसेच मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि व इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र आवश्यक.

**३) लघुटंकलेखक :-** माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. अथवा उच्च शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र धारक , लघुलेखन ८० श.प्र.मि. तसेच इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि किंवा मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि या अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र आवश्यक.

**४) ग्रंथपाल -नि-वार्डन :-** शासन मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदवी तदनंतर डिप्लोमा इन लायब्ररी सायन्स/बी.लीब/ग्रंथालय शास्त्रातील किमान व्दितीय श्रेणीतील पदवी घेऊन उत्तीर्ण आहेत अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाने केली जाईल.

**५) लिपिक-नि टंकलेखक (कनिष्ट लिपिक) :-** माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. अथवा उच्च शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र धारक. मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि किवा इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि अर्हतेचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र आवश्यक. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील एम.एस.सी.आय.टी ही संगणक परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र नियुक्तीनंतर विहित मुदतीत सादर करणे आवश्यक राहील. नसल्यास शासन निर्णय सा.प्र.वि.क्रं प्रशिक्षण २०००/प्रकरण-६१/२००१/३९, दिनांक १९.०३.२००३ अन्वये सदर संगणकाची अर्हता नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाच्या आंत प्राप्त करणे आवश्यक राहील. माध्यमिक शालान्त परीक्षेत मराठी/हिदी विषयांचा समावेश नसत्यास, निवड झालेल्या उमदवारांना एतदर्थ मंडळाची मराठी/हिदी भाषा परीक्षा उत्तीर्ण विहित मुदतीत होणे आवश्यक राहील.

**६) वाहन चालक :-**

अ) गट ड संवर्गातील किमान ३ वर्षाची नियमित सेवा झालेला आणि या पदावर भरतीसाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता व अन्य अर्हता धारण करत असलेल्या योग्य व्यक्तिंच्या जेष्ठता अधीन पात्रता या निकषावर पदोन्नतीने किंवा.

ब) उमेंदवार प्राथमिक शाळेची चौथी इयता उत्तीर्ण असावा.व त्यास मराठी व हिदी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे..

क) ज्यांने मोटार वाहन नियम १९३९ नुसार मोटरकार अथवा जीप चालविण्यासाठी आवश्यक असलेला वाहनचालक परवाना प्राप्त केलेला आहे. ज्याला कमीत कमी ३ वर्षाचा हलकी वाहने चालविण्याचा अनुभव (क्लीन रेकॉर्ड) तसेच मोटरकार व जीप दुरूस्तीचे ज्ञान आहे, अशा कर्मचा-यातून केली जाईल.

**७) शिपाई :-** उमेंदवार प्राथमिक शाळेची चौथी इयता उत्तीर्ण असावा व त्यास मराठी व हिदी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

**८) सफाई कामगार :-** उमेदवार प्राथमिक शाळेची चौथी इयता उतीर्ण असावा व त्यास मराठी व हिदी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

**९) स्वयपाकी /मदतनीस :-** इयता चौथी उत्तीर्ण, शाकाहारी/मांसाहारी आहारातील उत्कृष्ट सेवेचा व तदअनुषंगिक कामाचा अनुभव.

६. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा. अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे. मागासवर्गीय असलेले आरक्षण हे केवळ महाराष्ट्रातील रहिवासी असलेल्यांसाठी व महाराष्ट्रातील सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले, मागासवर्गीय असल्याचे प्रमाणपत्र धारण करीत असलेल्या उमेदवारांसाठी केवळ त्या प्रवर्गापुरतेच मर्यादीत राहील.

७. **उमेदवारांची माहिती संगणकावर एकत्रित करण्यांत येणार असल्याने परीक्षेसाठी विहीत केलेला नमूना अर्ज** MKCL. **www.oasis.mkcl.org/dhe या संकेत स्थळावर मिळेल.**

लेखी परिक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालांत परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल

**१) विषय**

१) भाषा मराठी ५० गुण
२) भाषा इंग्रजी ५० गुण
३) सामान्य ज्ञान ५० गुण
४) अंकगणित ५० गुण

**एकूण २०० गुण**

**२) शिपाई/पहारेकरी/सफाई कामगार, सेवक-नि-ग्रंथपाल सहाय्यक.**

१) भाषा (मराठी) २५ गुण
२) सामान्य ज्ञान २५ गुण
३) अंकगणित २५ गुण

**एकुण ७५ गुण व मौखिक गुण २५**

**परीक्षेचे स्वरूप**

| **अ.क्र.** | **संवर्ग** | **परीक्षेसाठी गुण** | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | लेखी परिक्षा | व्यावसायिक चाचणी | मौखिक परीक्षा | एकूण गुणे |
| १ | उच्चश्रेणी लघुटंकलेखक, निम्नश्रेणी लघुटंकलेखक व लघुटंकलेखक | १०० | ८० | २० | २०० |
| २ | लिपिक नि टंकलेखक | २०० | - | - | २०० |
| ३ | वाहन चालक | ५० | ४० | १० | १०० |
| | शिपाई/पहारेकरी/सफाई कामगार/सेवक-नि-ग्रंथपाल सहाय्यक | ७५ | - | २५ | १०० |

८. लिपीक नि-टंकलेखक संवर्गातील पात्र उमंदवारांना शासन निर्णय दिनांक-१९/१०/२००७ नुसार परीक्षेचा दर्जा कमीत कमी अर्हता माध्यमिक शालान्त परिक्षा इयता १० वी आहे. अशा पदांकरिता परीक्षेचा दर्जा महाराष्ट्र राज्यातील माध्यमिक शालान्त परीक्षेच्या दर्जाच्या समान असेल व लेखी परीक्षेला मराठी, इग्रजी, सामान्य ज्ञान व बौधिक चाचणी या विषयांवरील प्रश्नाकरिता प्रत्येकी ५० गुण ठेवून एकूण २०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.

९. शासन निर्णय दि- १९/१०/२००७ नुसार लिपीक –नि-टंकलेखक या पदाकरिता मौखिक परीक्षा घेण्यात येणार नसून फक्त लेखी परीक्षेच्या गुणांच्या आधारे मेरीट यादी/गुणवत्ता यादी तयार केली जाईल.

१०. वाहनचालक संवर्गातील पात्र उमदवारांना शासन निर्णय दि- १९/१०/२००७ नुसार उमेदवारांची प्रथम ५० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. लेखी परीक्षेमध्ये पात्र झालेल्या उमेदवारांची व्यावसायिक चाचणी ४० गुणांची घेण्यात येईल. व्यावसायिक चाचणीमध्ये पात्र झालेल्या उमेदवारांची मौखिक चाचणी १० गुणांची घेण्यात येईल.

११. शिपाई पदाकरिता लेखी परीक्षेतील गुणवत्तेनुसार व कागदपत्रांची तपासणी झाल्यानंतर पात्र उमदवारांची २५ गुणांची मौखिक परीक्षा घेण्यात येईल, लेखी व मौखिक परीक्षेचे गुण एकत्रित करून गुणानुक्रमानुसार अंतीम गुणवत्ता यादी तयार केली जाईल.

१२. दि- १९/१०/२००७ च्या शासन निर्णयात निश्चित केलेल्या प्रमाणानुसार शिपाई संवर्गातील भरावयाच्या पदांबाबतीत लेखी परीक्षेतील गुण विचारात घेऊन पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी/मौखिक परीक्षेसाठी बोलावण्यात येईल.

१३. शिपाई पदासाठी असलेल्या मौखिक परीक्षेस उमेदवार गैरहजर राहिल्यास उमेदवाराची निवड करण्यात येणार नाही.

१४.लेखी परीक्षा केंद्राची माहिती व परीक्षा प्रवेशपत्र सांकेतांक क्रमांक एम के सी एल च्या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

१५.जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नावनोंदणी केली असली तरी वरील पदासाठी ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक आहे.

१६. विहीत मर्यादेतील शासकीय / निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालयीन प्रमुखांच्या परवानगीने भरावेत .

१७.महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास वर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम, २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.८) हा अधिनियम महाराष्ट्र शासनाने दिनांक २९.०१.२००४ पासून अंमलात आणला आहे. त्यानुसार उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर) तत्व वि.जा.-अ, भज-ब, भज-क, भज-ड, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग यांना लागू आहे. या प्रवर्गातील उमेदवारांनी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सन २०१३-१४ या कालावधीचे सक्षम अधिकाऱ्याचे नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

१८. महिला व बाल कल्याण विभाग, शासन निर्णय क्रमांक ८२/२००१/म.से.आ.२०००/ प्र.क्र.४१५/का-२ दिनांक २५.०५.२००१ मधील तरतुदीनुसार महिलांचे आरक्षण दर्शविण्यात आलेले आहे. महिला उमेदवारांचे अर्ज प्राप्त न झाल्यास पुरूष उमेदवारांच्या अर्जाचा विचार केला जाईल. खुल्या प्रवर्गातील महिलांसाठीच्या राखीव पदाकरिता अर्ज करतांना उन्नत व प्रगट गटात मोडत नसल्याचे सक्षम अधिकाऱ्याच्या प्रमाणपत्राची छायाप्रत असणे आवश्यक आहे..

१९. सामान्य प्रशासन विभाग शासन अधिसूचना क्रमांक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दिनांक २८.०३.२००५ व शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/ २०००/१२, दिनांक ०१.०७.२००५ नुसार लहान कुटूंब असल्याचे प्रतिज्ञापत्र .

२०. अंशकालीन कर्मचाऱ्यांची, त्यांच्या अनुभवाची, सेवायोजना कार्यालयाकडे नोंदणी असणे आवश्यक आहे. तसे केल्याचे पुरावे तसेच उमेदवार माजी सैनिकं असल्यास त्यांनी जिल्हा सैनिक बोर्डात नावनोंदणी केली असल्यास प्रमाणपत्राची छायांकित प्रत असणे आवश्यक आहे.

२१. उमेदवाराची लेखी परिक्षा कोणतेही कागदपत्रे पूर्व तपासणी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत गुणाच्या आधारे उमेदवाराला कोणताही हक्क राहणार नाही. कागदपत्राच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवाराची गुणवत्तेच्या आधारे सामाजिक/समांतर आरक्षणनिहाय अंतिम निवड केली जाईल.

२२. भूकंपग्रस्त/प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी दिलेले उमेदवाराचे नाव नमूद केलेले सक्षम प्राधिका-याकडील प्रमाणपत्र धारण केलेले असले पाहिजे.

२३. रिक्त पदांच्या संख्येत कमी / जास्त बदल होण्याची शक्यता आहे. त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, पदांची संख्या, समांतर आरक्षण याबाबत बदल करणे, परीक्षा स्थगित करणे व रद्द करणे, अंशतः बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार मा.संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे हे स्वतःकडे राखून ठेवत आहे. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही.

२४. शासन निर्णय क्रमांक अनियो/१००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१.१०.२००५ नुसार दिनांक ०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर ज्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होईल. त्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती योजना लागू ठरेल. सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागू राहणार नाही. निवड झालेल्या उमेदवारांना शासनाच्या प्रचलित नियमानुसार वेतन व भत्ते मिळतील.

२५. उमेदवार ज्या राखीव जाती प्रवर्गातील पदांसाठी अर्ज करीत असेल त्या जाती प्रवर्गाचे जातीचे सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेले प्रमाणपत्र व उपलब्ध असल्यास जाती वैधता प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. निवड झालेल्या / पात्र होणाऱ्या उमेदवारास जात पडताळणी प्रमाणपत्र सादर केले नंतर नेमणूक आदेश देणेत येईल.

२६. माजी सैनिकांच्या समांतर आरक्षणामध्ये युध्दात/सैन्य दलातील सेवेत मृत्यू पावलेल्या किंवा अपंग झालेल्या सैनिकांच्या वारसास प्राधान्य दिले जाईल. त्यांनी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयात नावनोंदणी केल्याचे नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

२७. लेखी परीक्षेस उमेदवारांना स्वखर्चाने हजर रहावे लागेल. लेखी परिक्षा पुणे शहरातील कोणत्याही केंद्रावर घेण्यात येईल.

२८. स्वातंत्र्य सैनिकांच्या नामनिर्देशित व्यक्ती, संपकालीन कर्मचारी, १९८१ चे जनगणना कर्मचारी, १९९१ चे जनगणना कर्मचारी आणि अंशकालीन पदवीधारक बेरोजगार यांच्यासाठी शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.एईएफ-१०९२/३६५५/प्र.क्र.९०/९२/१६अ दिनांक ३१.०५.१९९३ व पअंक १०९७/१७९३/प्र.क्र/४/९८/१६अ दिनांक १९.०३.१९९८ अनुसार पसंतीक्रम राहील.

२९. विभागीय आयुक्त (अतिरिक्त संवर्ग) यांच्याकडून समायोजनाचे काही कर्मचारी वर्ग झाल्यास व इतर कारणांमुळे जाहिरातीतील रिक्त पदसंख्येत / आरक्षणामध्ये कमी जास्त बदल होण्याची शक्यता आहे. याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

३०. आरक्षित पदाकरीता निवड झालेल्या उमेदवारांना जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र शासन नियमाप्रमाणे विहीत मुदतीत सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा त्यांची नियुक्ती रद्द ठरविण्यांत येईल. याबाबत नियुक्तीच्यावेळी लागू असलेल्या शासन निर्णयानुसार कार्यवाही केली जाईल

३१. गट ड शिपाई पदांसाठी लेखी परीक्षा व मुलाखतीव्दारे प्राप्त केलेल्या गुणांची एकत्रित बेरीज करून त्या आधारे पदासाठी गुणानुक्रमे प्रवर्गनिहाय निवड यादी जाहीर केली जाईल. समान गुण धारण करणा-या त्या त्या संवर्ग /प्रवर्गाच्या उमेदवारांमध्ये त्यांची उच्च शैक्षणिक अर्हता, वय,अनुभव जातीचा प्रवर्ग, विचारात घेवून निवड केली जाईल. या बाबत उमेदवारास कोणताही दावा सांगता येणार नाही.

३२. **प्रत्येक पदांसाठी स्वतंत्र अर्ज करणे आवश्यक आहे.**

३३. **उच्चश्रेणी लघुटंकलेखक, निन्मश्रेणी लघुटंकलेखक व लघुटंकलेखक, आणि लिपिक-नि टंकलेखक , ग्रंथपाल नि वार्डन, शिपाई वाहन चालक या पदांची परीक्षा स्वतंत्र घेण्यात येईल.याची माहिती उमेदवारांना MKCL च्या संकेतस्थळावरून उपलब्ध होईल.**

३४. निवड प्रक्रीया सुरू झालेनंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती/अगर कोगदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास

आलयास त्या उमेदवाराची उमेदवारी/नियुक्ती निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर रद्य करण्यात येईल व फौजदारी गुन्हा नोंदविला जाईल.

३५. उमेदवाराने त्यांच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात यईल.

३६. अंतीम किंवा यादी/प्रतिक्षा यादीतील पात्र उमेदवारांनी शासकीय सेवेत रूजू होण्यापुर्वी किंवा ३ वर्षे सेवेत राहण्याबाबतचे प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक राहील.

३७. लेखी परिक्षा व मौखिक परिक्षा केवळ मराठी माध्यमातून घेतली जाईल

३८. कागदपत्र पडताळणीच्या वेळेस उमेदवारांनें अर्जासोबत सर्व कागदपत्रांची मुळप्रत आणि एक साक्षाकिंत प्रत आणने आवश्यक आहे..

## ऑनलाईन अर्ज करावयाची कार्यपध्दती व इतर सुचना

१) जाहिरात काळजीपूर्वक वाचावी

२) ऑनलाईन अर्ज एमकेसीएल च्या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

३) ज्या पदासाठी उमेदवारांस ऑनलाईन अर्ज भरणार आहे त्या पदाची पात्रता जाहिरातीमध्ये काळजीपूर्वक वाचावी लहान कुटुंब असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्राचा नमुना सदर संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

४) उमेदवाराने ऑनलाईलन अर्ज भरतेवेळी सर्व आवश्यक कागदपत्रे व स्तत:जवळ असल्याची खात्री करावी. अर्ज भरतेवेळी फोटो, सही स्कॅन करून अपलोड करावी.

५) ऑनलाईन अर्ज करण्यासाठी उपरोक्त संकेतस्थळावर Apply Online या लिंक Link वर क्लिक करून अर्ज भरण्यास सुरूवात करावी.

६) जर प्राथमिक पात्रता चाचणीत आपण पात्र असाल त्या पदासाठी अर्ज भरावयाचा आहे ते पद निवडा आणि आवश्यक माहिती भरा.

७) आवश्यक माहिती भरल्यानंतर संगणक प्रणालीत तुमचा लॉगीन (Login) आयडी (ID) आणि पासवर्ड (Password) निर्माण करून तुम्हाला स्क्रीनवर दाखवेल, आणि तुम्ही पुरविलेल्या भ्रमणध्वनी क्रमांकावर एसएमएस करेल. **(कृपया आपला भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक अचूक टाकावा)** तुमचा लॉग इन आयडी म्हणजेच तुमचा अर्ज क्रमांक असल्याची नोंद घ्यावी.

८) उमेदवारांनी अर्जासोबत माहिती सादर करताना सतत कार्यान्वित असलेला भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक व ई मेल आयडी नमूद करावा जेणेकरून आपणास संपर्क करून आवश्यक ती माहिती देणे सुलभ होईल.

९) **अर्जाचे वेळापत्रक :-**

| अ.क्र | तपशील | कालावधी दिनांक | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| १ | ऑनलाईन अर्ज करणेचा कालावधी | २६-०९-२०१३ | १४-१०-२०१३ |
| २ | संगणकीय चलनाव्दारे स्टेट बॅक ऑफ इंडियाचे (S.B.I) शाखेमध्ये फी स्वीकृतीचा कालावधी | २६-०९-२०१३ | १७-१०-२०१३ |
| ३ | ज्यांचे अर्ज दिनांक- १४/१०/२०१३ रोजी दाखल झाले आहेत. व ज्या उमेदवारांनी बॅकेमध्ये दि-१७./१०/२०१३ पर्यत भरती प्रक्रिया शुल्क जमा केले असेल त्यांच्यासाठी ऑनलाईन अर्ज भरणेचा अंतीम दिनांक | २१/१०/२०१३ | |

१०) माहिती भरलयानंतर उमेदवारांने अर्जाची पिंट स्वतः काढावी ती आपल्या माहितीसाठी जतन करून ठेवावी. अर्जदाराने नियमितपणे वेबसाईटला भेट द्यावी. **ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर अर्जाची प्रत प्रिंट काढून शिक्षण संचालनालय पुणे किंवा एम के सी एल ला पाठविण्याची आवश्यकता नाही.**

११) ज्या उमेदवाराने ऑनलाईन नोंदणी केली आहे आणि आवश्यक आवेदन शुल्क मुदतीत आदा केले आहे व संपूर्ण माहिती भरून प्रिंट काढलेली आहे त्यांना लेखी परीक्षेचे प्रवेशपत्र (हॉल तिकीट) त्यांच्या लॉगीन आयडीव्दारे MKCL च्या वरील नमूद संकेतस्थळावरून डाऊनलोड करता येईल. . यासाठी वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही यांची नोद घ्यावी.

१२) परीक्षा केंद्रावर ओळखपत्रासह परीक्षा सुरू होण्यासाठी एक तास अगोदर राहणे आवश्यक आहे.उशिरा येणा-या व प्रवेशपत्र न आणणा-या उमेदवारांना परीक्षेकरिता प्रवेश दिला जाणार नाही, तसेच उमेदवारांनी स्वतःचे फोटो असलेले ओळखपत्र उदा- वाहन परवाना , पॅनकार्ड, निवडणूक ओळखपत्र इ सोबत आणणे आवश्यक राहील.

१३) उमेदवारांन ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी काही अडचणी आल्यास MKCL च्या कॉलसेंटर नं- ९३२६५५२५२५ या नंबरवर संपर्क साधावा.

१४) अर्जामध्ये नमूद केलेली माहिती चुकीची अथवा खोटी आढळून आल्यास संबंधित उमेदवार दंडात्मक कारवाईस पात्र राहील तसेच चुकीची माहितीच्या आधारे नियुक्ती झाल्यास तात्काळ सेवेतून काढून टाकण्यास पात्र राहील व भा.दं.वि.संहिताचे कलम १९९ व २०० (२) प्रमाणे कारवाईस पात्र राहील.

१५) उच्चश्रेणी लघुटंकलेखक, निम्नश्रेणी लघुटंकलेखक व लघुटंकलेखक, लिपिक-नि-टंकलेखक, वाहन चालक, ग्रंथालय नि वार्डन , शिपाई/पहारेकरी/सफाई कामगार/सेवक-नि-गंथपाल सहाय्यक, शिक्षण संचालनालय पुणे व विभागीय सहसंचालक उच्च शिक्षण पुणे यांच्या आस्थापनेवरील भरती परिक्षांचा दिनांक व वेळ कार्यक्रम MKCL च्या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

१६) **परीक्षा शुल्क :-**

सदर भरती प्रक्रियेत खालीलप्रमाणे परीक्षा शुल्क आकारले जाणार असून सदर परीक्षा शुल्क हे नापरतावा राहील.

१) **खुला प्रवर्ग** : रूपये ५००/- (अक्षरी पाचशे रूपये फक्त)

२) **मागास प्रवर्ग** : रूपये ३००/- (अक्षरी तीनशे रूपये फक्त)

३) **माजी सैनिक** : परीक्षा शुल्क नाही तथापि त्यासाठी त्यांनी सैनिकी सेवेचा पदावधी पूर्ण केल्याबाबतच्या कायमुक्त पत्राची सांक्षाकित प्रत स्कॅन करून ऑनलाईन अपलोड करणे बंधनकारक आहे. सदर कार्यमुक्त पत्राची प्रत सादर न केल्यास वर नमूद केल्याप्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक राहील.

**अधिक माहिती मिळण्याचे ठिकाण** www.oasis.mkcl.org/dhe **ही वेबसाईट दि- पासून कार्यरत होईल. सदरील जाहिरात ही : www.dhepune.gov.in वेबसाईट वर देखील पाहण्यासाठी उपलब्ध आहे.**

**डॉ.प्र.रा.गायकवाड**
प्र. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे १